## शासकीय नर्सिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांशी सुसंवाद

**स्वत:ला ओळखायला शिका – श्रद्धा कळंबटे**

स्वयंसेतूतर्फे ‘तरुणांपुढील आव्हाने’ या विषयावर श्रद्धा कळंबटे यांनी शासकीय नर्सिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांनी मनमोकळेपणाने आपापले विचार मांडले. यामध्ये स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार, मुलींचे घटते प्रमाण, स्त्री–पुरुष समानता, अंधश्रद्धा, बालगुन्हेगारी या बरोबरच आपला जोडीदार कसा असावा यावर मुला–मुलींनी उत्स्फूर्तपणे आपापली मते मांडली. आजवर स्वयंसेतूतर्फे ३०० हून अधिक चर्चासत्रे घेण्यात आली.

कोणत्याही गोष्टीत समाधान मिळवायचे असेल तर स्वत:ला ओळखायला शिका, स्वत:ची तुलना अन्य कुणाशी करू नका आणि प्रत्येक गोष्टीत समतोल साधता आला तर कोणतंही यश आपल्यापासून दूर नाही असा संदेश श्रद्धा कळंबटे यांनी तरुणाईला दिला. योग्य मार्गदर्शनाअभावी कोणत्याही बिकट प्रसंगात सध्याची तरुण पिढी भरकटत आहे. अशावेळी तुम्ही आमच्याशी संपर्क साधू शकता. असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाला नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती नानचे, उपप्राचार्या श्रीमती म्हाकले, तसेच पाठ्यनिर्देशिका श्रीमती पांडव, श्रीमती सुरवसे, श्रीमती दळवी उपस्थित होत्या. त्यांनीही चर्चेत उत्स्फूर्तपणे भाग घेऊन कार्यक्रमाला रंगत आणली. श्रद्धा कळंबटे यांनी स्वयंसेतूतर्फे सर्वांचे आभार मानले.